# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १५९ वा ❑ शुक्रवार दि.०८ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

## ‘महादेवी’साठी कोल्हापूरकरांचा जनक्षोभ

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी जीनसेन मठाची माधुरी महादेवी हत्तीण परत करा या मागणीसाठी स्थानिक लोकांनी मोठा आक्रोश केला.. जनभावना मोठ्या प्रमाणावर उफाळून येत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर गेल्या आठवड्यात कोल्हापूर येथील नांदणी मठातून माधुरी उर्फ महादेवी हत्तीणीचे वनतारा येथे स्थलांतर करण्यात आले. त्यानंतर, या निर्णयाला विरोध आणि समर्थन अशा भूमिका पाहायला मिळत आहेत. मात्र, कोल्हापूरवाशियांनी भावनीक होत आपला विरोध दर्शवला.

महादेवी (हत्तीण) चे स्थलांतर गुजरात मधील वनतारा येथे न्यायालयाच्या आदेशानुसार झाले आहे. कोल्हापूरमधील नांदणी मठातून तिला जामनगर येथील राधे कृष्ण एलिफंट वेलफेयर ट्रस्टच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या वनतारा येथे हलवण्यात आले आहे.

या स्थलांतराचे मुख्य कारण म्हणजे महादेवीची योग्य देखभाल आणि आरोग्य सुनिश्चित करणे. २०१८ मध्ये महादेवीची देखभाल करणारा माहूत आजारी पडल्याने तिच्या देखभालीमध्ये अडचणी येत होत्या. त्यामुळे, प्राणी-अधिकार संस्था (पेटा) आणि न्यायालयाच्या आदेशानुसार, तिला अधिक चांगल्या सुविधा आणि निगा मिळावी यासाठी गुजरातला हलवण्यात आले.

या स्थलांतरामुळे कोल्हापूरमधील नागरिकांनी तीव्र विरोध दर्शवला, कारण महादेवी त्यांच्यासाठी मंदिराचा एक महत्त्वाचा भाग बनली होती. परंतु, प्राणी कल्याणाच्या दृष्टीने उचललेले हे पाऊल असल्याचे सांगितले जात आहे, असे सरकारनामा मध्ये म्हटले आहे.

महादेवीला वनतारा येथे स्थानांतर का करण्यात आले याचा खुलासा प्राणी-अधिकार संस्थाने केला.

पेटा या विख्यात प्राणिमित्र संघटनेने सन २०२२ पासून या हत्तीणीची माहिती घेतली होती. ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी पेटाने वन आणि पर्यावरण मंत्रालयाच्या उच्चस्तरीय समितीकडे यासंदर्भात विस्तृत तक्रार केली. या तक्रारीसोबत या हत्तीणीची अवस्था दाखविणारी छायाचित्रे, पशुवैद्यक तज्ज्ञांचे अहवाल, तिला झालेल्या शारीरिक दुखापती आणि तिची मानसिक अवस्था तसेच तिचा व्यापारी आणि अवैध वापर होत असल्याबाबत तपशील आणि पुरावे देखील जोडले होते.

या हत्तीणीला २०१२ पासुन ते २०२३ पर्यंत तेरा वेळा महाराष्ट्रातून तेलंगणामध्ये बहुतेक वेळा वनखात्याच्या योग्य परवानगीशिवाय नेण्यात आले होते. ८ जानेवारी २०२३ रोजी तेलंगणा वनखात्याने यासंदर्भात वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ च्या कलम ४८ ए आणि ५४ नुसार, वन्यजीव गुन्हा, पीओआर क्रमांक १२-०७/२०२२-२३ नोंदवला. सार्वजनिक मिरवणुकीत या हत्तीणीला अवैधरीत्या सहभागी केल्याबद्दल हत्तीणीचा माहूत इस्माईल याच्याविरुद्ध हा गुन्हा नोंदवण्यात आला. नंतर यासंदर्भात २५ हजार रुपये भरल्यानंतर आणि गुन्हा कबूल केल्यानंतर या गुन्हात तडजोड झाली आणि हत्तीणीचा ताबा कोल्हापूर येथील स्थानिक माहुताकडे सोपवण्यात आला. मात्र हत्तींनीचा वापर व्यापारी तत्त्वावर करण्यात येत होता असेही अहवालातून आणि छायाचित्रांमधून स्पष्ट करण्यात असा अहवाल पेटा या प्राणीमित्र संघटनेने केला मात्र हे सर्व आरोप कोल्हापूर वाशीयांनी फेटाळून लावला. असून वनताराने हत्ती देण्याची सुपारी घेतली आहे असा आरोप केला आहे.

या हत्तीणीला आपल्याजवळ ठेवण्यासाठी कोल्हापूरकरांनी सरकारला विनंती केली, उच्च न्यायालयात, सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. पण न्यायालयानेही म्हणणं न ऐकल्यावर मात्र संताप अनावर झाला अन् त्यातूनच दगडफेक झाली. आता तर थेट जियो सीम कार्डलाच टार्गेट करायचे सुरु आहे. बायकॉट जियो हा ट्रेंडच कोल्हापूरमध्ये सुरु झाला आहे.

हत्तीनी परत मिळावी यासाठी संपूर्ण कोल्हापूरकर रडत आहे. आक्रोश व्यक्त करत आहे कोल्हापूर करांचा आक्रोश बघता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वोच्च न्यायालयात पुनरावलोकन याचिका दाखल करणार असल्याचे म्हणत कोल्हापूर वाशीयांना हमी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हत्तीनीला परत आणण्यासाठी राज्य सरकार स्वतः सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणार आहे विशेष म्हणजे नांदणी मठाला ही स्वतंत्र याचिका दाखल करण्यास सांगण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालय पुनर्विलोकन याचिका दाखल होईल का? न्यायालयाचा निर्णय काय राहील यावर आता सर्वांचे लक्ष लागले आहे.. निकाल येईल तोपर्यंत कोल्हापूरकरांचे डोळे पाणावलेले राहील हे मात्र निश्चितच!

# ‘‘श्यामची आई’’ परत एकदा सर्वोत्कृष्ट

ज्योतिर्मय साहित्य




श्यामची आई या २०२३ साली प्रदर्शीत झालेल्या सुजय डहाके यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या चित्रपटाला ७१ व्या राष्ट्रीय चित्रपटात सर्वोत्तम मराठी चित्रपटाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळाले आहे. श्यामची आई हा चित्रपट साने गुरुजींच्या सुप्रसिद्ध आत्मचरित्रावर आधारित आहे. या आधीही १९५३ मध्ये श्यामची आई या नावाचा चित्रपट आचार्य अत्रे यांनीही सानेगुरुजींच्या आत्मचरित्रावरच प्रदर्शित केला होता. १९५४ साली या चित्रपटाला सर्वोत्तम चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार (सुवर्ण कमळ) मिळाला होता. त्यामुळे एकाच कथेवर आधारित, एकाच नावाच्या चित्रपटाला दोन वेगवेगळ्या काळात हे मानाचे राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याचा हा दुर्मिळ योग आहे. अभिनेत्री गौरी देशपांडे हिने श्यामची आई २०२३ साली प्रदर्शीत झालेल्या मराठी चित्रपटात श्यामची आईची (यशोदा) भूमिका साकारली असून, त्यांच्या अभिनयाचे समीक्षक आणि प्रेक्षकांनी कौतुक केले आहे. या भूमिकेसाठी त्यांना २०२४ मध्ये फिल्मफ अर पुरस्कार व महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण - सर्वोत्तम अभिनेत्री हे पुरस्कार मिळाले. त्यांच्या अभिनयाच्या दर्जाची ठळक पावती या पुरस्कारांमुळे निश्चित झाली. समीक्षक व रसिकांच्या मते, त्यांच्या अभिनयाचा मुख्य गुण म्हणजे त्यांच्या आईच्या भूमिकेमध्ये दिसलेली भावनिक सुस्पष्टता, संवादातील नैसर्गिकता व चेहऱ्यावरील सूक्ष्म हावभाव हे होत. तसेच आई या भूमिकेतील वात्सल्य, कठोरता आणि आशयपूर्ण नेमकेपणा या सर्व पैलूंना त्यांनी कमालीच्या सहजपणे पडद्यावर साकारले आहे.

साताऱ्यात २४ एप्रिल २०२४ रोजी आम्ही पुस्तकप्रेमी समूह व दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने आम्ही गौरी देशपोडे यांची मुलाखत आयोजित केली होती. गौरी देशपांडे यांची मुलाखत डॉ. संदीप श्रोत्री आणि आदिश प्रकाश पायगुडे यांनी घेतली. या मुलाखतीमुळे सातारकर रसिक मंत्रमुग्ध झाले. मुलाखतीमध्ये त्यांच्या अभिनय कारकीर्दीचा प्रारंभ, त्यात आलेल्या अडचणी सांगत असताना आई-वडीलांचा प्रारंभी विरोध होता पण एकंदरीतच मी ज्यांच्याबरोबर सर्वस्व पणाला लावून मेहनत घेऊन अभिनय क्षेत्रात प्रगती करत होते हे पाहून त्यांनी उत्तेजन दिल्याचे गौरी देशपांडे यांनी कथन केले. साताऱ्यातील नाट्यकलावंतांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या, चित्रपट क्षेत्रात संधी खूप आहेत पण परिश्रमाची गरज असून प्रारंभी अपयश आले तरीसुद्धा न डगमगता या क्षेत्रातला प्रवास चालू ठेवावा. मला यश मिळण्यामध्ये वाचन संस्कृतीचा मोठा वाटा असून त्या वाचनाचा उपयोग मला अभिनयाच्या वेळी होत असतो. यावेळी त्यांनी किरण येले यांची सुरमई ही कविता वाचून दाखविली. ती अशी आहे...




या कविता सादरीकरणामुळे त्या नुसत्याच अभिनेत्री नसून त्यांना समाजभान असल्याचे सर्वांना जाणवले. त्यापेक्षाही ही कविता ऐकल्यानंतर निशब्द झालेल्या रसिकांना स्त्री करीत असलेले कामकाज किती महत्वाचे आहे हेही जाणवले. गौरी देशपांडे यांनी स्पीच आणि लँग्वेज पॅथॉलॉजी या विषयात शिक्षण घेतल्यामुळे संवादफेक व आवाजाच्या विविध छटा मांडण्यात त्यांनी अद्वितीय प्राविण्य मिळविल्याचे सर्वांच्या लक्षात आले. वाचन, पठन, काव्यलेखन तसेच विविध साहित्यिक-कलात्मक प्रयोग यामुळे त्यांच्या अभिनयात सर्जनशीलता आणि खोल विचारांची झलक आढळते. शब्दांपलीकडची संवादशैली, चेहरा आणि डोळ्यातून भावना पोहचवण्याची ताकद आणि नैसर्गिक साधेपणा हे सर्व गुण सातारकरांना गौरी देशपांडे यांच्या व्यक्तिमत्वात बघायला मिळाले. सुरमई या कविता सादरीकरणाने स्त्रीचे भावविश्व, तिची सहनशीलता याचा अचूक वेध गौरी देशपांडे यांनी घेतला. स्त्रीचे समाजातील स्थान आणि तीचे भावविश्व यांचे चित्रण या कवितेत असल्यामुळे या कवितेला एक सामाजिक संदर्भ आहे. ही कविता स्त्रीयांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकून त्यांचे महत्व आणि समाजातील योगदान अधोरेखित करते. स्त्रीच्या सौंदर्यासोबतच तिची आंतरिक ताकद ही कविता दर्शविते.

गौरी देशपांडे या उत्तम अभिनेत्री असून आपल्या काव्य वाचनाचा छंद देखील जोपासत मराठी भाषा समृध्दीला हातभार लावण्यासाठी सादरीकरणाच्या माध्यमातून विशेष प्रयत्नशील आहेत. निराग स्टुडिओज यांच्यामार्फत आजवर त्यांनी भरपूर काव्यवाचन केले आहे. चंद्र प्रथम पाहिला, आताशा मी नसतेच इथे, पैठणी, पृथ्वीचे प्रेमगीत या त्यांतील महत्वाच्या कविता.

श्यामची आई नंतर गौरी देशपांडे विविध मराठी चित्रपट आणि मालिकांमध्ये काम करीत आहेत. २०२५ मध्ये त्या समसारा या नवीन मराठी चित्रपटात दिसणार आहेत आणि अजून काही परियोजनांमध्ये त्यांची निवड झाल्याची माहिती समजतेय. त्यांच्या साताऱ्यातील मुलाखतीने २४ एप्रिलची सायंकाळ सर्वांच्याच स्मरणात कायम राहिली आहे. ‘श्यामची आई या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने व गौरी देशपांडे यांची त्या

तुम्हांला सुरमई माहीत आहे का ?  
बरोब्बर !  
चवदार रसरशीत सुरमई कुणाला माहीत नाही?  
पण तुम्ही सुरमई विषयी आणखी काही सांगू शकाल?  
अरे। तुम्हाला तर सगळंच माहीत आहे;  
तिची चमचमती त्वचा,  
तिचं ताजेपण ओळखण्याची कला,  
तिची महागलेली किंमत...... सगळंच.  
आता आणखी विचारलं तर तुम्ही सांगालही;  
तिला काय केलं म्हणजे ती जास्त चवदार होते ते, तिला एखाद्या पार्टीत सर्व्ह करताना कसं सजवावं ते, किंवा तिला खाण्यापूर्वी कसं मुरवत ठेवावं ते.  
पण माफ करा,  
तुम्हास सुरमई विषयी सगळंच माहीत आहेअसं तुम्हाला वाटत असेल तर ते साफ चूक आहे;  
तुम्हाला सुरमईचं समुद्रातलं सळसळण माहीत नाही,  
तुम्हांला सुरमईला काय आवडतं ते माहीत नाही,  
तुम्हांला सुरमई आतल्या आत काय विचार करत असते ते माहीत नाही,  
आणि जाळ्यात सापडल्यावर सुरमईची होणारी उलाघाल तर तुम्हांला नक्कीच माहीत नाही !  
एक सांगतो, रागावू नका;  
तुम्हांला खरं तर सुरमईची फक्त चव माहीत आहे, सुरमई नाही आणि जे सुरमईच्या बाबतीत....  
तेच अगदी तेच- बाईच्याही.

चित्रपटातील भूमिका प्रमुख असल्याने सातारकरांना विशेष आनंद वाटला. मानधनाचा विचार न करता सर्व ठिकाणी आपली सामाजिक बांधिलकी गृहीत धरून विचारधन पेरणाऱ्या गौरी देशपांडे यांचे मराठीजनांना विशेष कौतुक व अभिमान वाटतो.

# टेरिफ बॉम्ब आणि भारताचा स्वदेशी ब्रह्मास्त्र...

ज्योतिर्मय साहित्य





खुद्द रशियाने भारताच्या भूमिकेचे समर्थन केले आहे आणि कच्च्या तेलाच्या खरेदीबाबत ट्रम्प यांनी भारतावर जी आग पाखड केली ती चुकीची आहे कुठल्याही स्वतंत्र्य राष्ट्राच्या, सार्वभौम राष्ट्राच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा दुसऱ्या देशाला काय अधिकार? असा प्रश्न रशियन प्रवक्त्याने विचारला आहे. तसेच अलीकडेच अमेरिकेचे आणखी एक पितळ उघडे पडले आहे मागील जानेवारी ते मे या पाच महिन्याच्या काळात अमेरिकेने रशियाकडून केलेल्या आयातीमध्ये २५% नी वाढ झाली आहे. म्हणजे खुद्द अमेरिका रशियाकडून अनेक वस्तूंची खरेदी करते पण इतर देशांनी काहीही खरेदी केली तर मग मात्र त्यांचा जळफळत होतो. ट्रम्प यांचे खाण्याचे आणि दाखवण्याचे दात वेगळे आहेत हे आता जगाच्या लक्षात येत चालले आहे.




स्वदेशीचे ब्रम्हो मिसाईल

अमेरिकेच्या टेरीफ बॉम्बचा सामना करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वदेशीचे प्रमुख अस्त्र वापरले आहे अलीकडे बनारस येथे झालेल्या शेतकऱ्यांच्या कार्यक्रमात त्यांनी स्वदेशीचा जागर घडविला. स्वदेशी हाच आपल्या प्रगतीचा मंत्र आहे, आत्मनिर्भर भारताचा पाया आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. भारतीयांनी भारतात तयार झालेली भारतीय उत्पादने वापरली पाहिजेत आणि विदेशी वस्तु व सेवावर बहिष्कार टाकला पाहिजे. हे धोरण अत्यंत महत्त्वाचे आहे, लोकमान्य टिळक यांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणार अशी घोषणा केली होती तेव्हा त्यांनी सांगितलेल्या चतुसूत्री मध्ये स्वराज्य, स्वदेशी राष्ट्रीय शिक्षण, आणि परकीय वस्तूवरील बहिष्कार हे चार महत्त्वाचे बिंदू सांगितले होते याचा अर्थ असा होतो की १०५ वर्षे झाली पण टिळकांच्या विचारातील स्वदेशी आणि परकीय वस्तूवरील बहिष्कार ही दोन तत्वे आजही तेवढीच कायम आहेत. तेव्हा जर आपणास अमेरिकेसारख्या आडदांड आणि मतलबी देशाशी आर्थिक लढाई करावयाची असेल तर आपण आपल्या उत्पादनाचा वेग वाढविला पाहिजे दर्जा आणि गुणवत्ता यावर सतत भर दिला पाहिजे आणि जगातील नवनव्या बाजारपेठांचा शोध घेतला पाहिजे म्हणजे ट्रम्प यांच्या टेरिफ बॉम्बला निकामी करणे सोपे जाईल.

भविष्यातील सूचक घटनांचा विचार करता ट्रम्प यांचा टेरिफ बॉम्ब फुसका बार आहे हे आता सांगण्यासाठी फार वेळ लागेल असे वाटत नाही. काळ जसा पुढे जात आहे त्याबरोबर ट्रम्प यांची दमछाक होत आहे. आपल्या विरोधात अमेरिकेत होत असलेल्या जनआंदोलनामुळे हैराण होऊन ते लक्ष विचलित करण्यासाठी जगावर टेरिफ लादत आहेत. खुद्द अमेरिकेत वाढत असलेली बेकारी चलन फुगवटा आणि आर्थिक ताण-तणाव यामुळे अमेरिकेला पुन्हा ग्रेट बनविण्याच्या नादात ट्रम्प जगाला स्मॉल करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांची ही आर्थिक धोरणे अमेरिकेला दिवाळखोरीत घेऊन जाणारी ठरतील. त्यामुळे त्यांचे भलेबुरे व्हावयाचे ते होवो पण भारताने मात्र आता टेरिबॉम्बशी लढताना आपल्या स्वदेशी ब्रह्मोस्त्राचा उपयोग केला पाहिजे. त्यातच भारताचे खरे भविष्य आहे यात शंका नाही

भारताचे चोख प्रत्योत्तर

परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी प्रेसिडेंट डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्षेपांना दिलेले उत्तर रोखठोक आणि तेवढेच सुस्पष्ट आहे. त्यांनी अमेरिकेने केलेले सर्व आरोप नाकारले आहेत आणि भारताने रशियाबरोबर कच्च्या तेलाच्या खरेदीबाबत घेतलेली भूमिका कशी समर्थनीय आहे ते प्रभावी युक्तिवादाच्या आधारे स्पष्ट केले आहे. भारताच्या प्रवक्त्यांनी याची आठवण करून दिली की भारताच्या भूमिकेचे अमेरिकेने तेंव्हा ज्या सक्रियतेचे स्वागत केले होते आणि तेल आयातीला प्रोत्साहन दिले होते पण आता मात्र डोनाल्ड ट्रम्प ताकाला जाऊन भांडे का लपवित आहेत? भारताची कच्या तेलाची आयात ही जागतिक बाजारपेठेतील परिस्थितीमुळे भाग पडलेली गरज आहेहपण रशियाच्या तेल खरेदी मुळे ट्रम्प यांच्या नाकाला मिरच्या का लागल्या? याबाबत अमेरिकेने भारतावार टेरिफची सक्ती का करावी ? भारताबद्दल आग पाखड करणारी अमेरिका व युरोपीय राष्ट्रे स्वतः मात्र आगळीक का करीत आहेत? स्वतःचे पोट भरण्यासाठी मात्र पुरेसा व्यापार करतात तेव्हा त्यांना नीतीचे धडे का आठवत नाहीत? युरोपियन युनियन ने रशियासोबत आतापर्यंत ६०.५ अब्ज युरो एवढा द्विपक्षीय व्यापार केला आहे २०२३ मध्ये युरोपियन युनियन आणि रशिया यांच्यातील व्यापार हा १७.३ अब्ज युरो एवढा होता मागील वर्षाच्या १६.२ दशलक्ष टन या पेक्षाही ही वाढ निश्चितच जास्त होती. स्वतः युरोपियन युनियन रशियाशी सातत्याने चढ्यादरात व्यापार करत आहे पण भारताच्या व्यापारावरून मात्र का नाके मुरडत आहे? भारताचा कच्चा व्यापर युरोपियन युनियन पेक्षा कमी आहे. अमेरिकेचे ही धोरण असेच दुटप्पी आहे. अमेरिका सुद्धा रशियाकडून त्यांच्या अणू प्रकल्पासाठी युरेनियमची खरेदी करतो तसेच अमेरिका आपल्या स्वार्थासाठी रशियाकडून ईव्ही उद्योगासाठी लागणारी सामग्री तसेच खते रसायने मायनिंग व वाहतूक साधनेही अमेरिका खरेदी करत आहे युरोपियन युनियन भारतापेक्षाही अधिक तेल रशियाकडून खरेदी करत होता रशिया हा भारताचा विश्वासू व्यापारी मित्र आहे त्यामुळे आपल्या स्वायत्ततेबाबत विचार करता निर्णय घेण्यासाठी भारत स्वतंत्र आहे, मुक्त आहे. त्यामुळे अमेरिकेने घेतलेली भूमिका अयोग्य, असमंजस आणि अविवेकी आहे. अमेरिका आणि युरोपच्या धोरणाचे वस्त्रहरण रणधीर जयस्वाल यांनी काल पत्रकार परिषदेत केले. रशियाच्या तेल व्यवहारामुळे भारतावर पाचशे टक्के आयात कर लादण्याची धमकी म्हणजे ट्रम्प यांचा मस्तवालपणा होय. खरेतर रशिया विरुद्ध युक्रेनला अमाप शस्त्रे व अफाट पैसा बायदन यांच्या काळात अमेरिकेने युक्रेनला पुरविला. पण हे मात्र ट्रम्प विसरलेले दिसतात. तेलंही गेले तूपही गेले अशी त्याची गत झाली आहे, ट्रम्प सत्तेवर येऊन आठ महिने झाले तरी युद्धे काही थांबत नाहीत. निराशेपोटी ट्रम्प जगावर टेरिफचे वार करीत आहेत.


त्यांची ही हेकट भूमिका पाहता भारतानी चोख उत्तर दिले, आणि त्यामुळे अमेरिका कशी व किती जमिनीवर येणार हा खरा प्रश्न आहे. ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या तिसऱ्या आठवड्यात अमेरिकेचे शिष्टमंडळ भारतात येणार आहे त्याचे डोळे उघडावेत म्हणून भारताने स्पष्ट गणित मांडले आहेत, समीकरणे स्पष्ट केली आहेत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या पार्श्वभूमीवर घेतलेली स्वदेशीची भूमिका महत्त्वपूर्ण आहे कारण त्यामुळे आपणास आपल्या वस्तू व सेवांच्या निर्मितीचे वापराचे महत्त्व लक्षात येऊ शकेल हे धोरण आजचे नाही तर गेल्या दोन दशकापासूनचे आहे हे सुद्धा लक्षात घेतले पाहिजे. भारत एक महासत्ता आहे लोकशाही प्रजासत्ताक आहे त्यामुळे ट्रम्प यांच्या धमक्यांना भारत भीक घालणार नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे

समारोप

या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की डोनाल्ड ट्रम्प यांच्या टेरिफ धोरणाबाबत भारताने घेतलेला परखड पवित्रा योग्य आहे, रास्त आहे, ट्रम्प कितीही आदळ आपट करत असले तरी भारताला शांत आणि सावधपणे संवादाच्या मार्गाने उपाय शोधावे लागतील. भविष्यकाळामध्ये पाश्चात्त्य राष्ट्रांच्या पुंडाईस प्रतिशह देण्यासाठी आपणास गुणवत्ता चक्र हाती घ्यावी लागेल गुणवत्तेचे सुदर्शन चक्र हाती घेऊन आपण टेरीफ बॉम्बचा पराभव करू शकतो आपल्या वस्तू व सेवांचा दर्जा वाढविणे आणि स्वदेशी वस्तूंच्या वापराचा आग्रह धरणे हाच या सर्व संकटावर मात करण्याचा एकमेव मार्ग होय. लोकमान्य टिळक महात्मा गांधी आणि आता नरेंद्र मोदी यांची धोरणे ही आपल्या स्वदेशीचा जागर करणारी आहे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी आपल्या एकात्म मानवतावाद या सिद्धांतामध्ये सुद्धा स्वदेशीचा विचार मांडला आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वदेशी जागरण मंचने जशी लोक चळवळ केली तशी लोक चळवळ पुन्हा एकदा हाती घेऊन स्वदेशीच्या वापराबाबत प्रत्येक नागरिकाला आग्रही बनविणे आवश्यक आहे तसेच झाले तरच आपण येऊ घातलेल्या कोणत्याही टेरीफ बॉम्बची भक्कमपणे मुकाबला करू शकतो पण त्यासाठी आपण आपला स्वदेशीचे ब्रम्हास्त्र मात्र मजबूत ठेवले पाहिजे. त्यातच भारताचे उज्वल भविष्य सामावलेले आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रम्प यांच्या टेरिफ बॉम्ब ला स्वदेशी ब्रम्हास्त्राने चोख प्रत्योत्तर दिले आहे हाच महत्त्वाचा संदेश होय.

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख - 12



'ज्योतिर्मय 'च्या वाचकांना 'वास्तुशास्त्र पेंटींग' म्हणजे नक्की काय आहे याचा अंदाज आला असेलच. आता या लघुलेखात आपण, सदर पेंटींग हे 'सकारात्मकच' परिणाम कसे करते ? या प्रश्नाचं उत्तर जाणून घेवूया.

या प्रश्नाचं उत्तर जाणून घेवूया.

मागील लेखात आपण पाहिले आहेच की तीन प्रकारच्या "कुंडल्यां"चा अभ्यास करून आपण, 'पेंटींग'साठीचे घटक निश्चित करतो. राशी, नक्षत्र, नक्षत्र वृक्ष आणि राशी स्वामी नुसार 'रंगचक्रा'तील कोणते रंग, सदर वास्तुसाठी उचित परिणाम साधणारे ठरु शकतात त्यांची योजना या अभ्यासात केली जाते. एका विशिष्ट दिवशी, विशिष्ट वेळी हे 'वास्तुशास्त्र पेंटींग' जेव्हा सदर वास्तुमधील अगोदरच निश्चित केलेल्या भिंतीवर लावण्यात येते.

'वास्तुशास्म पेंटींग' किंवा बैठकीच्या ज्या कक्षात / हॉलमध्ये किंवा बैठकीच्या खोलीत लावण्यात येते, जिथे घरातील सर्वजण एकत्र बसतात, जेवण करतात वगैरे बाहेरील पाहुणे, नातेवाईक ओळखीचे मित्र परिवार आणि अनाहुत अभ्यागत जेव्हा बैठक कक्षात / हॉल मध्ये बसतात तेव्हा अगदी सहजपणे त्या हॉल मधील अंतर्गत गृह सजावटीकडे पहात असतात. ज्यांचा जो विषय आवडीचा असतो, त्यांची नजर त्या वस्तूवर स्थिरावते. जसे की, कुणाला हॉल मधील 'हांडे झुंबर' किंवा 'लँप' आवडतो, कुणाला पंखे आवडतात तर कुणाला सुशोभिकरणासाठी लावलेली चित्र आवडलात.

याच निरिक्षण प्रक्रियेच्या काळात, जेव्हा त्या व्यक्तीने 'वास्तुशास्त्र पेंटींग' कडे पाहिलेले असते, तेव्हा त्या पेंटींग मध्ये, उपयोगात आणलेले रंग, रंगाकार, चिन्ह, प्रतिके देखील त्या व्यक्ती कडे पहात असते. म्हणजे, त्या रंगांपासून निघणारी तेजोकिरणे त्या पेंटींगकडे पाहणाऱ्या व्यक्तीच्या डोळ्यातील "रेटीना" मार्फत डोळयात असलेल्या असंख्य, कोन्स' आणि "रॉडस" पर्यंत पोहोचतात. ही सर्व तेजोकिरणे सकारात्मक असल्याने, त्या परिवारातील घटकांच्या विचारांमध्ये ही 'सकारात्मक' बदल तयार होवू लागतात.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान  
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238

## आकर्षक बक्षिस योजना

वास्तुशास्त्र पेंटींग या अनोख्या विषयावरील "लघु लेखमाला" एका सप्ताहातच वाचकप्रिय होऊ लागली आहे.या लघुलेख मालेचे लेखक,हे जगप्रसिद्ध वास्तुशास्त्र आणि रंग शास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांना अनेक जिज्ञासू वाचकांचे फोन होताहेत. अशा वेळी, जेव्हा क्रमशः लेख क्रम राहून जातो.या लेखमालेतील प्रत्येक लेख हा कुठल्यातरी बाबीचा संदर्भ असु शकतो.म्हणून एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान आणि ज्योतिर्मय यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक योजना आणली आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग या लघुलेख मालेचे क्रमवार लेख दर महिन्याला जमा करून जो किंवा जे वाचक, ज्योतिर्मय च्या कार्यालयाकडे पाठवतील त्यापैकी भाग्यवान क्रमांकांना एस्.व्ही.एस्.कला प्रतिष्ठान कडून आकर्षक पारितोषिक प्रदान करण्यात येईल.



## जात्यावरच्या ओव्या......


मैनाला मागणं
पंच बसले उन्हात
अजून येईना बाई
हिच्या मामाच्या मनात ||१९५||

मैनाला मागंन
पुसा हिच्या ग आजीला
तोड्या खाली पैंजण
आणा माझ्या बिजलीला ||१९६||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# निसर्गायन - प्राणिजगत

## (माझ्या "रंगसोहळा" या पुस्तकातून )




**ज्योतिर्मय साहित्य**

निसर्गामध्ये प्रत्येक प्राण्याचे स्थान महत्वाचे आहे. वाघ, सिंह, हरीण इ प्रत्येक वन्य जीव या निसर्गाच्या साखळीचा एक भाग आहे. यामध्ये पशु पक्ष्यांबरोबरच कीटकांनाही महत्वाचे स्थान आहे. त्याचे कारण म्हणजे निसर्ग साखळीच अशी आहे की एकाच्या जीवावर दुसरा जीव अवलंबून असतो. जेव्हा वाघ, सिंह यांच्यासारख्या प्राण्यांची शिकार होते, तेव्हा जंगलात माकडे, हरीण, चितळ इ प्राण्यांची संख्या आपसूक वाढते. तर दुसऱ्या बाजूला हरीण, माकडे इ प्राण्यांची बेसुमार शिकार केली गेली तर वाघ, सिंह इ सारख्या प्राण्यानं जंगलात भक्ष्य न मिळाल्यामुळे ते मानवी वस्तीत शिकारीच्या शोधात आल्याची उदाहरणे आहेत. आणि आजही ते घडताना आपण पाहत आहोत.



वाघ आणि सिंह या प्राण्यांना निसर्गाने अप्रतिम सौंदर्य प्रदान केले आहे. त्यांची चपळाई, भक्ष्य पकडण्याचे कौशल्य, त्यांच्या पंजाच्या फटकाऱ्यात असणारी शक्ती या गोष्टी म्हणजे त्यांना निसर्गाने दिलेली देणगी आहे. पण त्यांच्या या गुणांवर भाळून मानव प्राचीन काळापासून त्यांची शिकार करण्यात शौर्य आणि धन्यता मानत आला आहे. राजे महाराजे, सरदार, धनिक लोक, हौशी शिकारी यांनी वाघांच्या अनेक शिकारी केल्या आहेत. काही वर्षांपूर्वी भारतात जिम कॉर्बेट नावाचा प्रसिद्ध शिकारी होऊन गेला. त्याचा जंगल आणि वन्य प्राण्यांचा अभ्यास खूपच दांडगा होता. त्यांनी आपल्या अनुभवावर आधारित अनेक पुस्तकेही लिहिली. त्या पुस्तकांची अनेक भाषांमध्ये भाषांतरे झाली आहेत.

जिम कॉर्बेट यांनी आपल्या आयुष्यात एकूण एकोणीस वाघ आणि चौदा बिबटे यांची शिकार केली. पण त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी एकाही निरपराध वाघाची किंवा बिबट्याची शिकार केली नाही. जे वाघ किंवा बिबट नरभक्षक झाले होते, ज्यांनी अनेक नरबळी घेतले होते, अशाच वाघ आणि बिबट्या यांच्या शिकारी नाईलाज आणि गरज म्हणून त्यांनी केल्या. जंगलातील वाघांची संख्या कमी होत चालली आहे हे त्यांनी आपल्या दूरदृष्टीने ओळखले होते. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि वन्य जीवांच्या प्रेमामुळे भारतात प्राण्यांसाठीची अभयारण्ये अस्तित्वात आली. आता अनेक ठिकाणच्या जंगलात वाघांची संख्या वाढते आहे ही समाधानाची बाब आहे.

पूर्वी आपले ऋषी मुनी, साधू संत जंगलात वास्तव्य करून असत. त्यांनी या प्राण्यांना प्रेम लावले. त्यांच्या प्रेमाची शक्ती अशी काही विलक्षण होती की त्यांच्या सहवासात हे हिंस्त्र जीव आपली हिंस्रता विसरून गेले. अगदी आजच्या काळात देखील या वन्य जीवांना प्रेम देऊन वाढवणारे लोक आहेत.

**(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# उपदेशलक्षण

**ज्योतिर्मय साहित्य**

सहा चक्रे

मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध आणि सहस्त्रदल,

प्राण व अपान यांचे मिलन करून सुषुम्ना नावाच्या कण्यांतील सुक्ष्म नाडीच्या मार्गाने प्रत्येक चक्राचे भेदन करून प्राण मूर्ध्नि आकाशात न्यावयाचा असतो.

अजपाजय - माणूस जीवंत असेपर्यंत त्याचा श्वासोच्छ्वास अखंड चालू असतो. तो आपोआप होणारा जप आहे. श्वास आत घेताना सो व श्वास बाहेर सोडताना हम् असा सूक्ष्म नाद होतो,त्या नादावर मन एकाग्र केलें तर चोवीसतास विनासायास जप चालतो. त्यालाच अजपाजप म्हणतात.

सगुणसाकारभक्ति, निर्गुणनिराकार भक्ति, तिर्थाटन, करावे असे सांगतात.

कोणी शक्तिमार्ग सांगतात देवीची उपासना करण्याचा मार्ग,

आत्मज्ञानावाचून उपदेशाचे सर्व प्रकार व्यर्थ आहेत. आत्मज्ञानासारखे पावित्र्य दुसऱ्या कशातचं नाही. म्हणून आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावे. सर्वात श्रेष्ठ आत्मज्ञानाचा उपदेश आहे. हे विसरू नये.


माणूस कोणत्याही वर्णाचा असो त्याच्या अंगी जर आत्मज्ञान स्थिरावले तर या जगात तो जन्मोजन्मी परमात्म्याचा दास होतो.

उपदेशनाम समास ४ था समाप्त

श्री राम जय राम जय जय राम

जय जय रघुवीर समर्थ

# संतांनी लिहिलेले ग्रंथ हे त्यांच्या मृत्युपत्रासारखे आहेत.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

संतांना ग्रंथ लिहिण्याची मुळीच हौस नसते, नाइलाज म्हणून ते ग्रंथ लिहीत असतात. तुम्हाला असे वाटते का, की नाथांनी आणि समर्थांनी ज्ञानेश्वरीची पारायणे करून नंतर आपले ग्रंथ लिहिले ? त्यांचे ज्ञान स्वतंत्र असते, आणि ते साक्षात् भगवंतापासून आलेले असते. त्यामधे अर्थात् मागील ग्रंथकारांनी सांगितलेल्या काही गोष्टी येणारच. संतांनी लिहिलेले ग्रंथ हे त्यांच्या मृत्युपत्रासारखे आहेत. आपले मुलगे चांगले वागतील अशी ज्या बापाला खात्री वाटते तो कशाला मृत्युपत्र लिहील ? तशी ज्याला खात्री नसते तो नाइलाजाने मृत्युपत्र लिहितो ! त्याचप्रमाणे, संतांनी हौसेने किंवा विद्वता दाखविण्यासाठी ग्रंथ लिहिले नाहीत, तर आपल्यासारख्या जडजीवांचे कल्याण व्हावे ही तळमळ त्यांना होती म्हणून त्यांनी ग्रंथ लिहिले. पोथी, पुराणे, सत्पुरुषांचे ग्रंथ, यांचा आपल्या जीवनाशी निकट संबंध असतो. असल्या ग्रंथांमध्ये, ज्याचा व्यवहारामध्ये उपयोग करता येतो असा वेदान्त सांगितलेला असतो. आपल्याला सुचणार नाहीत इतक्या शंका समर्थांनी घेऊन त्यांची उत्तरे दासबोधात दिली आहेत. परमार्थ न ऐकणारा दोषी आहे, पण तो ऐकत नसताना त्याला सांगणारा त्याहूनही दोषी समजावा. हा दोष पत्करूनही संत जगाला परमार्थ सांगत असतात, त्याचा फायदा करून घ्यावा.

ग्रंथ वाचीत असताना, ध्येय जर परमार्थप्राप्ती हे असेल तर त्यासाठी त्या ग्रंथात साधन कोणते सांगितले असेल इकडे लक्ष असावे. साधनाची योग्य निवड झाली की साध्य साधेलच. ज्या विषयात पारंगत व्हायचे तीच पुस्तके वाचणे जरूर असते. आमचे उलट होते; गणित विषय घेतो आणि वाचतो कादंबऱ्या ! मग गणितात पास कसे होणार ? परमार्थ हेच जर ध्येय असेल तर संतांच्या ग्रंथांचाच अभ्यास करावा, त्यांचेच श्रवण-मनन करावे.

आपण आपले मन भगवंताच्या चरणावर चिकटवून ठेवावे, आणि देह प्रारब्धाच्या प्रवाहामध्ये सोडून द्यावा. कधी तो सुखात राहील, तर कधी तो दुःखात राहील; कधी तो बरेच दिवस सरळ जाईल, तर कधी तो मधेच गचका खाऊन बुडायच्या बेताला येईल; पण त्याच्या कोणत्याही अवस्थेमधे आपला आनंद कायम टिकेल यात शंका नाही. आपल्या देहाकडे आपण वेगळेपणाने पहायला शिकले पाहिजे. मन द्यावे भगवंताला आणि देह द्यावा प्रारब्धाला, म्हणजे हे साधेल. देहाचे सुखदुःख वरवरचे असावे, ते आत शिरून मनावर परिणाम करता कामा नये. भगवंताच्या नामाने हे हमखास साधते. म्हणून अखेर नामाशिवाय गत्यंतर नाही.

संतांच्या ग्रंथाचा खरा अर्थ कृतीनेच कळेल.

## || संत महात्म्य ||

**लेखक - मधुकर बोरीकर**
**9403061886**

# संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

**ज्योतिर्मय साहित्य**

इथेही आपणास विषयाकडे वळलेले मन दुःख देणारे तर ब्रह्मरूप झालेले मन हे सुख देणारे, महानंद देणारे व उन्मनी अवस्थेत गेलेले दिसून येते.

तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात

नको नको मना गुंतू माया जाळी
काळ आला जवळी ग्रासावया
काळाचीए उडी पडेल बा जेव्हा
सोडविना तेव्हा मायबाप

विषयात अडकलेले मन हे माया जाळात अडकलेले आहे तिथे त्याला गुंतू देऊ नकोस तर ते ब्रह्मरूप कर आत्म्याकडे वळव कारण केव्हाही काळ ग्रासेल असेच तुकाराम महाराज सांगतात.

समर्थ रामदास स्वामी मनाविषयी काय म्हणतात तेही आपण पाहू

मना पाप संकल्प सोडून द्यावा
मना सत्य संकल्प जीवि धरावा
मना कल्पना ते नको विषयाची
विकारी घडे हो जनी सर्व ची ची

विषयात अडकलेले मन हे पाप संकल्प करणारे असते तर सत्य संकल्प हा केवळ आत्म्यात लीन होणारे मनच करू शकते. ते करावे. मनात विषयांची कल्पना करू नये. कारण त्यामुळे विकार ग्रस्त मन होते. असेच रामदास स्वामी हे सांगतात.

संत कबीर म्हणतात कबीरा मन निर्मल करे जैसे गंगाका नीर पाछे पाछे हरी फिरे कहत कबीर कबीर मनातील विकारांचा मळ काढून मन हे गंगेच्या पाण्या सारखे निर्मळ करायला हवे. त्यासाठीची साधना करायला हवी. असे केले तर तुम्हाला परमेश्वराच्या पाठीमागे लागण्याची गरज नाही, तर उलट तोच तुमच्या पाठीमागे लागेल. असे कबीर म्हणतात.

आपले मन स्वाभाविकपणे विषयाकडे वळलेले असते. यात सतत नवनवीन कल्पना चे उन्मेश भरून येतात. इच्छा आकांक्षा जन्म घेतात व म्हणूनच असे मन हे अल्पजीवी सुख व दीर्घकाळ दुःख देणारेच ठरते या अल्पजीवी सुखाकडून शाश्वत सुखाकडे जायचे असेल तर मनाचा फेर उलट करून आत्म्याकडे वळवावा लागेल. आणि यासाठी सद्गुरुला शरण जाऊन त्यांच्या सानिध्यात कठोर साधना ही करावी लागेल. अशी साधना आपण करावी असेच संकेत ज्ञानेश्वर माऊली या अभंगातून आपणास देत आहेत.

जीवनाचे ध्येयच मुळी दुःखाची निवृत्ती व सुखाचा शाश्वत लाभ हेच आहे दुःखाचा त्याग होऊन सुखाचा लाभ कसा मिळावा याचा मूलमंत्र देणाऱ्या महान मानसोपचार तज्ज्ञ संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणावर विनम्र भावाने प्रणिपात करून हा भाग इथे संपवूया

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम

जय हरी माऊली

***

## || निरूपण ||



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

१७. राहीन सर्वस्व अर्पूनी।।

पहा आमुचा रूबाब। त्यासी नसे रे जबाब।
विश्वाचिया मालकीण। मैत्रीण ही वैतरणी।।
शक्ती पायी आम्ही आलो। शक्तीची कृपा पावलो।
ऐसिया प्रतिज्ञा केली। शक्ती पूजीन जीवनी।।
मायपिताबहिण। बंधु चुलता चुलती।
आमुची तो सर्व नाती। पाहे ठायी भवानी।।
माय आम्हां पाठीराखी। उरले रे काय बाकी।
हास म्हणे मी पायी। राहीन सर्वस्व अर्पूनी।।

१८. सद्गुरुकृपा

माझी नाही रे रचना। नाही माझी रसना।
शब्द गुरुप्रसादाचा। नाही कोणाचा उसना।।
सद्गुरू रे माझा थोर। बसे नित्य पद्मासना।
साधे अंबेसी संवादु। मंत्रजप रात्रंदिना।।
त्यांसी रेणुका प्रसन्ना। नमावे त्या भगवाना।
गुरु सांगे ज्या वचना। चंद्रहासा येई काना।।



## आरोग्य संजीवनी

# सोरायसिस लक्षणे

**ज्योतिर्मय साहित्य**

**सांधे दुखी**

सोरायसिस तीव्र झाल्यास त्यामुळे तुम्हाला सोरायटिक आर्थ्राटीसचा त्रास जाणवू शकतो. सोरायटिक आर्थ्राटीसमुळे तुमच्या सांध्यावर वाईट परिणाम होतो. तुमच्या एक अथवा दोन्ही बाजूचे सांधे यामुळे दुखावले जाऊ शकतात. यामुळे हाता-पायाच्या सांध्यामध्ये सूज आणि वेदना होतात. वेदनेची तीव्रता इतकी वाढत जाते की यामुळे तुम्हाला दैनंदिन कामे करणेही कठीण होते.

**सोरायसिसची कारणे**

सोरायसिस होण्यामागची कारणे प्रत्येक व्यक्तामागे वेगवेगळी असतात. त्यामुळे सोरायसिस होण्यामागचं नेमकं कारण कुणीच सांगू शकत नाही. मात्र ही काही कारणं आहेत ज्यामुळे सोरायसिस होऊ शकतो.

**अनुवंशिकता**

काही संशोधनात असं आढळलं आहे की जर एखाद्याच्या आई-वडीलांना, आजी-आजोबांना अथवा भावंडांना सोरायसिस झाला असेल तर त्या व्यक्तीला सोरायसिस होण्याचा धोका इतरांच्या तुलनेत जास्त असतो. यामागे त्यांच्यातील अनुवंशिकता कारणीभूत असू शकते. जरी तुमच्यामध्ये अनुवंशिक गुण असले तरी वातावरणातील बदलामुळेच हे गुणधर्म कार्यान्वित होतात. त्यामुळे जोपर्यंत वातावरणात असे बदल होत नाहीत तो पर्यंत सोरायसिस त्या व्यक्तीमध्ये सहज विकसित होत नाही.

**त्वचेवरील जखमा**

जर तुमच्या त्वचेवर कापल्याच्या, ओरखडे उठल्याच्या, कीटकदंशाच्या, एखाद्या इनफेक्शनच्या जखमा असलीत तर अशा स्थितीत सोरायसिस बळावण्याची शक्यता दाट असते. त्यामुळे त्वचेवरील अशा गंभीर जखमा हे देखील सोरायसिस होण्यामागचं एक कारण असू शकतं. बऱ्याचदा गंभीर प्रमाणात झालेलं सनबर्नही सोरायसिस होण्यामागचं एक कारण असू शकतं. त्यामुळे जर तुमच्या त्वचेवर अशा जखमा असतील तर त्यावर त्वरीत योग्य ते उपचार करा.

**सुर्यप्रकाश**

मानवी शरीराच्या वाढ आणि विकासासाठी योग्य प्रमाणात सुर्यप्रकाश मिळण्याची आवश्यकता असते. कारण सुर्यप्रकाशातून शरीराला व्हिटॅमिन डी चा पूरवठा होत असतो. मात्र नैसर्गिक सुर्यप्रकाश हा प्रमाणातच मिळणं गरजेचं आहे. शिवाय सकाळचे कोवळे ऊनच त्वचेसाठी उपयुक्त असते. त्यानंतरचे प्रखर ऊन त्वचेसाठी उपयुक्त तर ठरत नाही उलट अपायकारक ठरू शकते. अशा प्रखर सुर्यप्रकाशामुळेही सोरायसिस होऊ शकतो, शिवाय ज्यांना आधीच सोरायसिस आहे त्यांच्यासाठी सुर्यप्रकाश हानिकारक ठरू शकतो.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

**औषधे**

काही औषधे आणि स्टिरॉईडच्या वापरामुळेही शरीरात दाह आणि जळजळ निर्माण होते. ज्याचा परिणाम त्वचेवर सोरायसिस होण्यावर होऊ शकतो. त्यामुळे जर तुम्ही घेत असलेल्या औषधांमुळे अथवा स्टिरॉईडमुळे तुम्हाला त्वचेवर गंभीर लक्षणे जाणवू लागली तर अशी औषधे घेणे त्वरीत थांबवा. शिवाय याबाबत डॉक्टरांचा योग्य तो सल्ला घ्यावा.

नव्याने उपलब्ध असलेला प्रभावी उपाय-

हे एक यावरील प्रभावी उपाय म्हणून नव्याने पुढे येत आहे. तेही वापरायला हरकत नाही. त्याचेही उत्तम परिणाम पाहायला मिळाले आहेत.

***

## ||श्री राम कथा||



वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर


**ज्योतिर्मय साहित्य**

तो युद्धात तुला सहज हरवेल. त्यापेक्षा तू त्याच्या मृत्यूची प्रतीक्षा कर. त्याचा मृत्यू , समोर एक मोठा दरवाजा होता ,तो नष्ट झाला की होणार होता. रावणाने त्या दाराला तोडण्या साठी जोरात लाथ मारली.तेंव्हा आतून एक कर्कश्य किंकाळी ऐकू आली.ती भस्मासुराची होती. त्यास रावणाने बाहेरूनच विचारले की का किंचाळत आहेस,तुम्ही कोण आहात ?तो म्हणाला मी भस्मासुर या दाराच्या आतही आर्या आहेत त्या माझ्या डोळ्यावर टेकवून मला आत बांधले आहे.कोण्या मूर्खाने आता दार ढकलले व माझे डोळे फुटले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

रावणाने विचारले की तुला कोणी व का बांधले? तो म्हणाला मी महादेवाच्या पत्नीवर डोळा ठेवल्याने ही शिक्षा मला झाली.मला असे कळाले आहे की कोणी एक रावण नावाचा मूर्ख येईल. तो ही देवाची पत्नी पळवेल, तेंव्हा राम त्याचा वध करून इथे आणतील आणि त्याला इथे ठेवले जाईल व माझी सुटका होईल. रावणाने हे भविष्य जाणून अज राज्याशी भांडण करणे टाळले.

माणसाची बुद्धी ही त्याच्या कल्याणा साठी व अकल्याण व्हावे म्हणून देखील उपयोगी पडते.बुद्धी शुद्ध असावी.त्यावरील मळ काढावा लागतो.जी सदा सम,सदा निर्विकार, सदा शुद्ध बुद्धी ठेवावी लागते. बुद्धी चांगली असेल तर ते घर रामाचे व जर बुद्धी बिघडली तर ते घर रावणाचे झाल्या शिवाय रहात नाही. बुद्धी द्वारे आत्मज्ञान होते.परमात्मा सर्वत्र असला तरी तो केवळ बुद्धी द्वारेच कळतो. **(क्रमशः)**




# श्रावण मास अनुष्ठान हा दासवीरनाथ महाराजांचा कृपाप्रसाद होय-ज्ञानराज

**ज्योतिर्मय साहित्य**

**सोलापूर** – आपण अद्वैत धर्म भक्ती उपासनेचे स्थापक पुरस्कर्ते आदि शंकराचार्यांच्या पासून चालत आलेल्या परंपरेतील व सद्गुरु श्री विरनाथ मल्लनाथ संस्थान च्या २६० वर्षाच्या गुरु शिष्य परंपरेतील साधक आहोत तृतीय सत्पुरुष सद्गुरु श्री दास्वीरनाथ महाराज यांनी औसा व पंचक्रोशीतील शिष्यांसाठी नाथ मंदिरात जे श्रावण मासाचे अनुष्ठान सुरू केले त्याचा हा कृपाप्रसाद होय असे प्रतिपादन ह भ प श्री ज्ञानराज महाराज यांनी केले.

नाथ मंदिरात २५ जुलैपासून सुरू झालेल्या वार्षिक श्रावण मास उत्सवात सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या अधिपत्यात व सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनात श्रावण अनुष्ठानचे व्रत मोठ्या भक्ती भावाने संपन्न होत आहे त्यात नित्य चक्रीभजन व ज्ञानेश्वरीवर सहाव्या पिढीतील साधक श्री ज्ञानराज गुरुबाबा महाराज औसेकर हे तेवढ्याच निष्ठेने श्रद्धेने व परिश्रमाने श्री गुरुबाबा व गहिनीनाथ महाराज यांच्या आज्ञेतून नाथमंदिरातील चक्रीभजनाची व प्रवचनाची सेवा उत्तम रीतीने रुजू करीत आहेत.

पहाटे काकडा स्वयंभू विठ्ठलास व पावन परंपरेतील सद्गुरु समाधीस लघु रुद्र अभिषेक नंतर आरती महाप्रसाद, महापंगती दुपारी दोन वाजता महिलांचे बैठकी भजन, दुपारी चार वाजता संस्थानचे परंपरेतील सेवाधारी माळी समाज बांधवांचे बैठकी भजन संपन्न होते.


बरोबर सायंकाळी सहा वाजता विठ्ठल परमात्म्याचा दर्शन देऊन आलेला थकवा हा धुपारती करून काढला जातो ही धुपारती ह भ प श्रीरंग गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या सुरेख संकल्पनेतून व नियोजनातून दररोज संपन्न होते. एक ऑगस्ट रोजी धुपारती सोहळ्यासाठी लोहगावचे सर्वश्री संतोष आप्पा खांदवे तुकाराम पवार, राहुल वाकडकर, सचिन निंबाळकर, नवनाथ दादा व इतर शिष्य मंडळी आवर्जून सहभागी झाली होती. ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायातील तिसऱ्या श्लोकातील ५७ व्या ओळीवर सुरेखाचे चिंतन मांडताना ज्ञानराज माऊली यांनी अंश-वंश रिफ्लेक्शन, आत्मा-परमात्मा, आत्माराम सुखात्मक वंश उत्पत्ती स्थिती लय ब्रम्हांड सूर्य मंडळ अशा जटील विषयावर सखोल असे चिंतन मांडले.


माणूस देवाने, निसर्गाने, कृतीने दिले त्याचे मोल, महत्व, सामर्थ्य, शक्ती, ऊर्जा, अधिकार जाणत नाही नवे माहिती असून देखील या ज्ञानाची साधना करण्यात तो कमी पडतो माणूस मी पणात अडकतो माझे माझे म्हणतो वास्तवात ते त्याचे नसते याचे ज्ञानच त्याला नसते, देणारा दाता तो परमात्मा त्याचे स्मरण करणे, नामस्मरण घेणे, त्याची सेवा करणे जरुरीचे असून तो प्रपंच जीवनात बेफिकीर वृत्तीने राहतो आणि आपल्या हाती जवळ असलेला आनंद गमावून बसतो ही अवस्था अज्ञानामुळे होते असे महाराज म्हणतात.

शुक्रवारी संभाजी औटी, मोतीचंद



मास्तर दुरुगकर सोमवंशी आष्टा कासार व इतर भक्तांनी आपली माळ सेवा गुरुचरणी रुजू केली. माळेदिवशी महापंगती प्रसंगी नाथ संस्थानच्या वतीने श्री गुरुबाबा गहिनीनाथ महाराज यांच्या हस्ते ९४ वर्षीय मोतीचंद दुर्गकर मास्तरांना शाल देऊन गौरवपूर्ण आशीर्वाद देण्यात आला.





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

## दिव्यत्वाची जेथ प्रचिती...

( गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या विषयीचे ५० लेख लिहून झाले आणि पुढील भाग कोणता लिहावा अशा विचारात असताना त्यांच्यासंबंधी काही विचार मला मध्यरात्रीनंतर स्फुरले. हे विचार म्हणजे गुरुदेवांचे जीवनकार्यच जणू ! ते आपल्या समोर ठेवण्याचा हा अल्पसा प्रयत्न )

अंथरुणावर पडल्या पडल्या माझ्या डोळ्यांसमोर साकार झाले ते पश्चिम बंगालचे विशाल आकाश

आणि त्या आकाशाच्या विस्तीर्ण पटावर चमकू लागले अनंत तारे.

कोणी घोष, कोणी मुखर्जी, कोणी चटर्जी, कोणी बॅनर्जी, कोणी उपाध्याय, कोणी बंदोपाध्याय, कोणी दत्त, कोणी चक्रवर्ती, कोणी रॉय...

प्रत्येकाचे तेज वेगळे होते पण त्या सगळ्या ताऱ्यांमध्ये उठून दिसणारा तारा होता रवींद्रनाथ टागोर या नावाचा आणि त्या ताऱ्याने पश्चिम बंगालचे आकाश उजळून निघाले होते.

त्याच्या उगवतीच्या रंगात पूर्व दिशा न्हाऊन निघाली होती.

सुरुवातीला छोटा असणारा हा बालरवी पाहता पाहता विशाल झाला आणि अवघे गगन त्याने व्यापले.

जे न देखे रवी ते देखे कवी असे म्हटले जात असताना हा रवी त्याला जणू अपवाद ठरला आणि त्याची सर्वस्पर्शी प्रतिभा जीवनातील सर्व क्षेत्रांना स्पर्श करती झाली.

या रवी किरणांचा स्पर्श झाल्यानंतर बागेतील कळ्या उमलू लागल्या.

या कळ्या होत्या कवितेच्या, नाटकाच्या, कथांच्या, कादंबरीच्या, शिक्षणाच्या, चित्रकलेच्या, नृत्यकलेच्या, गानकलेच्या, संगीतकलेच्या, अध्ययनाच्या अध्यापनाच्या...

अशा सगळ्या कळ्या विकसित होऊ लागल्या आणि त्यांचे सुरेख कमलपुष्पात रूपांतर झाले अशी जादू होती तुमच्या प्रतिभेच्या स्पर्शात !

तुम्ही झालात प्रकाश आणि शिकवले आम्हाला प्रकाशाकडे पाहणे. रोपटे प्रकाशाकडे पाहते आणि त्याचा वृक्ष होतो. त्याला कळी येते ती प्रकाशाकडे पाहते आणि कळीचे फुल होते.

फुल प्रकाशाकडे पाहते आणि त्याचे फळ होते.

अशाच कुतूहलाने तुम्ही जीवनातील सर्व गोष्टींकडे पाहिले. अगदी आयुष्याच्या अखेरपर्यंत जीवनाकडे कुतूहलाने पाहणारे तुमच्यातील बालक जिवंत होते.

असे म्हणतात की तुम्हाला केवळ चार ते पाच तासांची निद्रा पुरेशी होत असे. रात्री झोपताना आकाशातील तारकांचे निरीक्षण आणि सकाळी उठल्यानंतर उगवतीचा सूर्य, उमरलेली फुलं, पक्ष्यांचे थवे पहायला तेवढ्याच उत्साहाने आपला चेहरा देखील फुलासारखा उमललेला असायचा. हेच बघायला आपणआपण मुलांना शिकवलं...

तुमच्या शिक्षणात हे चैतन्य, हा आनंद भरून राहिला होता. मन, बुद्धी आणि मेंदू यांची शिकताना एकरूपता होती...

व्यवहाराबरोबरच सौंदर्याची जाणीव होती. विश्व भवत्येकनिडम म्हणजे एक घरटे व्हावे, सर्व धर्म, भाषा, प्रांत एकत्र नांदावे अशी आपली भावना होती...

त्यातूनच उमलली शांतीनिकेतन, श्रीनिकेतन आणि विश्वभारतीची कमलपुष्पे. या कमलपुष्पातील मकरंद सेवन करण्यासाठी देशोदेशीचे भ्रमर येऊ लागले शांतिनिकेतनात, श्रीनिकेतनात आणि विश्वभारतीत.

तुम्ही लिहिलीत गीते आणि ती गीते झालीत अजरामर गीतांजली !

(क्रमशः)

# मांजरी अभियांत्रिकी महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर

**ज्योतिर्मय साहित्य**

**मांजरी बुद्रुक** – रोटरी क्लब ऑफ मगरपट्टा सिटी आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अभियांत्रिकी महाविद्यालय मांजरी बुद्रुक, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी हे शिबिर खुले होते. या शिबिराचे उद्घाटन रोटरी क्लबचे डॉ. कुलदीप चरक, डॉ. त्रिंबक वाघचौरे, डॉ.अभिनव मिसुरिया, सूर्यकांत चौधरी, महेंद्र लुनिया, मिलिंद शिंदे, अमित सिंग व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रितेश पाटील यांच्या प्रमुख



उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरात सामान्य आरोग्य तपासणी, दात व डोळे तपासणी, थॅलेसेमिया रक्त तपासणी यासह इतर वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या. तसेच तज्ञ डॉक्टरांकडून व्यक्तिगत आरोग्य सल्ला व आहार मार्गदर्शन देखील देण्यात आले. एकूण ३२८ विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रितेश पाटील यांनी आपल्या भाषणात आरोग्याची जाणीव निर्माण करणाऱ्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले व रोटरी क्लबच्या सहकार्याबद्दल आभार मानले. त्यांनी विद्यार्थ्यांना निरोगी जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन केले. महाविद्यालय आणि रोटरी क्लबच्या संयुक्त प्रयत्नांतून यशस्वी पार पडलेल्या या आरोग्य शिबिरामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रितेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मदन वैद्य, प्रा.डी.एल. मुळे, डॉ.आर. के.मोजे, पी.एस.भाटी यांनी या आरोग्य शिबिराचे आयोजन केलेले होते.

## होली क्रॉस इंग्लिश हायस्कूल, छावणी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन


**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – सामाजिक भान राखून दिनांक ९ ऑगस्ट २०२५ रोजी होली क्रॉस इंग्लिश हायस्कूल, छावणी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. सकाळी ८.३० ते दुपारी १२.०० पर्यंत शाळेच्या सभागृहात हे रक्तदान शिबिर संपन्न होईल.

समाजाच्या ऋणातून उतराई होण्याची संधी रक्तदान शिबिराच्या माध्यमातून आपल्या सर्वांना मिळत आहे. त्याचप्रमाणे सामाजिक बांधिलकीची जाणीव आपल्या पाल्याला करून देण्यासाठी आपण स्वतःआपल्या परिवारातील इतर सदस्य व इष्ट मित्रांना घेऊन या रक्तदान शिबिरास सहकार्य करावे.

रक्तदानानंतर उपवासाच्या पदार्थांची व अल्पोपहाराची देखील सोय करण्यात आलेली आहे.रक्तदान केल्यानंतर आपणास प्रमाणपत्र देखील देण्यात येईल.

तरी जास्तीत जास्त नागरिकांनी ह्या रक्तदान शिबिरात सहभाग घ्यावा असे आवाहन मुख्याध्यापिका सिस्टर सिंथिया फर्नांडिस ह्यांनी केले आहे. संपर्कासाठी – ९८२२८१३२५२ राजेंद्र ब्राह्मणे.












## “जैत रे जैत“ च्या आठवणी....

आप्पासाहेब गो.नी.दांडेकर यांच्या जैत रे जैत कादंबरीवर आधारित जैत रे जैत चित्रपटाची निर्मिती उषाताई मंगेशकर व पं हृदयनाथ मंगेशकरांनी केली. ह्या निर्मितिला पन्नास वर्षे होत आहेत. त्या निमित्ताने पुण्यातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात चित्रपटातील

आठवणी जागवल्या गेल्यात. पं.हृदयनाथ, डॉ. मोहन आगाशे, सतिश आळेकर, रविंद्र साठे, मृणाल देव,आदिंचा सहभाग होता. ह्या सगळ्यांनी त्या वेळेच्या आठवणी सांगीतल्या. रविंद्र साठे, विभावरी आपटे, मनिषा निश्चल, यांनी चित्रपटातील लोकप्रिय गाणी ऐकवली. ना.धो.महानोरांची सोळा गाणी यात आहेत. आणि पं.हृदयनाथ यांचे संगीत. गाणे आणि संगिताबरोबरीने पुढे पुढे जाणारा चित्रपट सुरुवातीला प्रेक्षकांच्या पसंतीस




उतरला नाही. पण नंतरच्या काळात, अनेक पारितोषिके मिळाली. गाणेही अतिशय लोकप्रिय झालीत.

ग्रामीण भागात कलाकार एकरुप झाले, त्यामुळेच त्यात जिवंतपणा आला,आज ईतक्या वर्षानंतर ही चित्रपट आठवणीत रहातो. पण आता याच्यापुढे असा चित्रपट आल्यास त्याला प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळेल का? याविषयी त्यांनी साशंकता व्यक्त केली.

कार्यक्रमात जैत रे जैत चित्रपटाविषयी संपूर्ण माहिती असललेले “एक घोट मृगजळाचा“ ह्या पुस्तका विषयावर स्वतः लेखिका विजयालक्ष्मी मणेरीकर बोलल्यात.हे पुस्तक म्हणजे चित्रपटाविषयी,कथा,गाणी, संगीत, कलाकारां विषयावर सविस्तर लिहिले आहे.

थोडक्यात पुस्तकातून चित्रपट डोळ्यासमोर उभा रहातो.

दिलीप देशपांडे
मो.८९९९५६६९१७

# वर्षा ऋतू आणि कविता...

**ज्योतिर्मय साहित्य**

वर्षाऋतू म्हणजे जणू नवसंजीवनच. तृषार्त धरेला शांतवणारा ऋतू, अपूर्णतेला पूर्ण करणारा ऋतू, वर्षाऋतुचे हे चार महिने म्हणजे वर्षभर फुलून राहण्यासाठी, आनंदी राहण्यासाठी ऊर्जा संकलित करण्याचा काळ. चराचराला नवी ऊर्जा प्राप्त करून देणारा काळ.

असा चैतन्यदायी पाऊस प्रत्येक मनाला आवडतो, मग कवी त्यापासून कसा अलिप्त राहू शकेल नाही का? नवकवींपासून प्रतीथयश प्रस्थापित कवींपर्यंत सर्वांनाच पाऊस भूरळ घालतो. अनेक कविंनी पावसाला आपल्या शब्दात कैद केले आहे. पाऊस हा वयाच्या एखाद्या अवस्थेतच आवडतो असे नाही, तर लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच आवडतो. पावसाचे थेंब वाजू लागले की मुलांची चलबिचल चालू होते. त्यांच्या त्या भावना व्यक्त करताना श्रीनिवास खारकर म्हणतात...''

''टपटप बाहेर काय वाजतंय ते पाहू
चल गं आई चल गं आई पावसात जाऊ
पहा फुले, लता, तरू, चिमणी, गाय वासरू
चिंब भिजती मी तरी का घरात राहू
चल गं...''

बाहेर पाऊस आणि आई सर्दी-खोकल्याच्या भितीने बाहेर जाऊ देत नाही. त्या उत्साही मनाची विनवणी वंदना विटणकर आपल्या शब्दात मांडतात.

''ए आई मला पावसात जाऊ दे
एकदाच गं भिजूनी मला चिंब चिंब होऊ दे...''

खरोखर पाऊस आला की झाडांची पानेही हिरवी हिरवी गाणी गुणगुणू लागतात आणि सर्व काही विसरायला भाग पाडतात. उरतो केवळ आनंद आणि फक्त आनंद मंगेश पाडगावकर म्हणतात.

''टपटप थेंब वाजती,
गाणे गातो वारा
विसरा आता पाठी पुस्तक,
मजेत झेला वारा
पाऊस आला रे पाऊस आला''

हा पाऊस येताना एकटा येत नाहीच, तो आपल्यासोबत धुंद सुगंध, मनोहर नाद, वादळ वारा, आणि बरंच काही घेऊन येतो. शांता शेळकेंनाही पाऊस आल्यावर मातीचा धुंद सुगंध मोहीत करतो, मनाला व्याकुळ करतो. त्या म्हणतात-

''आला पाऊस मातीच्या वासात गं
मोती गुंफत मोकळ्या केसात गं
धुंद दरवळ धरणीच्या श्वासात गं''

पाऊस आल्यावर जसा निसर्ग कुस बदलतो ना तसेच पाऊस पडण्यापूर्वीच निसर्गाकडून वातावरण निर्मिती होत असते. काळे निळे घन दाटून येतात आणि मनामनाला आस लागते. आता थेंब पडणार आणि

''घन ओथंबून येती,
वनांत राघू भिरती
पंखावरती सर ओघळती,
झाडातून झाडाझडती..''

कवी ना. धो. महानोर यांनी खरेच किती सुंदर शब्दात भरून आलेल्या आभाळाचे कौतुक केले आहे. आरती प्रभू तर आर्ततेने साद घालतात.

''ये रे घना ये रे घना
न्हाऊ घाल माझ्या मना..''

चराचराला हा पाऊस हवा आहे या पावसाचे थेंब जसे शरीराला रोमांचित करतात तसेच मनाला सुद्धा ओढ असतेच नाही पावसाची. ही ओढ अनेक काव्यातून व्यक्त होते. शब्दाशब्दातून ती ओढ आपल्याला जाणवत राहते. पाऊस आणि प्रेम एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत की काय असे वाटते प्रेम म्हणजे फक्त मिलन नव्हे हं... विरह ही आहेच की.. पाऊस आणि प्रीतिचा अगदी जवळचा संबंध आहे म्हणाना. प्रीतिला नवी खुमारी पावसानेच मिळते. प्रेमातला आणि आपल्यातला तोच तोचपणा दूर करायचा तर पावसाशिवाय पर्याय नाही. पाऊस कोसळू लागतो आणि मग प्रत्येक प्रेयसी राधा आणि प्रियकर कृष्ण होतो. अशावेळी गंगाधर महांबरे यांच्या कवितेची आठवण येते.

''मला प्रीतिची झाली बाधा,
गोकुळाची झाली राधा नंदनवन खुलले,
फुलले माझिये हृदयात
आली सर ही आली ओली...''




अश्विनी जगताप, पिंपळे गुरव, पुणे
संपर्क : 9881218670

पी. सावळाराम यांची आपल्या सर्वांना आवडणारी कविता म्हणजे...

''रिमझिम पाऊस पडे सारखा
यमुनेलाही पूर चढे
पाणीच पाणी चहूकडे गं
बाई गेला मोहन कुणीकडे...''

कृष्ण आणि पाऊस यासंदर्भाने मला गदिमांची एक सुंदर कविता आठवते..

''कृष्णविरहिणी गवळण तिला अडवते, कवाड अंगण
अंगणी अवध्या तळे साचले, भिडले जलदारा
घनघनमाला नभी दाटल्या, कोसळती धारा....''

धो धो जलधारा कोसळत राहतात अशावेळी आपली प्रिय व्यक्ती आपल्यापासून दूर असेल तर मग विचारायलाच नको. आतुरता इतकी शिगेला पोहोचते की, बाहेर पाऊस, डोळ्यात पाऊस बरसत राहतो आणि मधुकर जोशींचे शब्द साद घालतात....

''झिमझिम झरती श्रावण धारा
धरतीच्या कलशात
प्रियविण उदास वाटे रात ...''
तर...
इंदिरा संत म्हणतात ..
''नको नको रे पावसा असा धिंगाणा अवेळी
घर माझे चंद्र मोळी आणि दारात सायली
किती सोसले मी तुझे माझे ऐकते ऐक ना
वाटेवरी माझा सखा त्याला माघारी आण ना...''

असा हा पाऊस त्याच्याकडे तक्रार आहे प्रियकर न भेटण्याची आणि त्यालाच आर्जव आहे प्रियकराला भेटविण्याची, कमाल आहे ना !

प्रत्येकाच्या कल्पनेतला पाऊस काय वेगवेगळ्या भावना घेऊन येतो नाही, पण हा पाऊस जास्त झाला तरी कसा होतो कवि अनिल म्हणतात..

''बाई या पावसानं,
लावियली झिमाडी
भिजवल माळरानं,
उदासलं मनं
नदीनाले एक झाले,
पूर भरूनिया चाले
जिवलग कोठे पडे बाई अडकून बाई या पावसानं...''

तर असा हा पाऊस कवितेतून धो धो तर कधी रिमझिम रिमझिम बरसत राहतो. कधी प्रेम ,कधी विरह कधी नुसता धिंगाणा आणि कधी निखळ आनंद......पावसाचे प्रत्येक रूप मला मोहित करते आणि मला सुचते..

ऋतू बहरला
मेघ बरसला
माझ्या अंगणी
मोत्यांचा सडा..
कधी..
आभाळाचे भरून येणें
रोज नव्याने पुन्हा गुंतणे
आसुसलेल्या धरेचे
रोज नव्याने पुन्हा गंधणे
कधी..
वेळी अवेळी कोसळतो
हा वेड्यासारखा
एकटेपणात छळतो
हा वेड्यासारखा
कधी..
आज जाहल्या गंधित वाटा कोसळल्या जलधारा
वृक्षलता अन् चराचराने केला असा पुकारा...
कधी
तप्त झालेली धरणी
करे मेघांची मनधरणी
कर मज धुंद गंधित
सरसर ये बरसुनि....
कधी..
ते थेंब टपोरे अन्
मखमली धुक्याची दुलई
गंध सुगंधी वारा
छत्रीत तू आणि मी..
आणि असं बरंच काही...

# पुणे जिल्हा शिक्षण मंडळातील गुणवंतांचा टिळक स्मारक मंदिरात सन्मान समारंभ

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** - पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विविध शाखेतील विशेष नैपुण्य प्राप्त शिक्षक, गुणवंत विद्यार्थी यांचा शुक्रवारी (८ ऑगस्ट) सत्कार करण्यात येणार आहे. टिळक स्मारक मंदीरात राज्याचे उपमुख्यमंत्री, संस्थेचे अध्यक्ष अजित पवार यांच्या हस्ते गुणवंतांना सन्मानित केले जाणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे आणि मानद सचिव ॲड. संदीप कदम यांनी दिली.

या कार्यक्रमासाठी आमदार चेतन तुपे, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.यावेळी दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर परीक्षेत अव्वल यश मिळविलेले विद्यार्थी, कला क्रिडा क्षेत्रातील गुणवंत खेळाडू त्याचप्रमाणे विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या शिक्षकांना गौरविण्यात येणार आहे.

यावेळी सेवक सहकारी पतसंस्था, सेवक कल्याण निधी, सेवक सहकारी ग्राहक संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा होणार आहे, असे खजिनदार ॲड.मोहनराव देशमुख, उपसचिव एल.एम.पवार, सहसचिव ए.एम.जाधव यांनी सांगितले.

# मराठी वाङ्मय मंडळाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन व आत्मस्पर्शी व्याख्यान

**ज्योतिर्मय साहित्य**

**नवी मुंबई :** पी.डि. कारखानीस कॉलेज ऑफ आर्ट ॲण्ड कॉमर्स, अंबरनाथ, येथे मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन सन्माननीय कवयित्री सौ. सुचिता बागडे-खाडे यांच्या हस्ते झाले. यानंतर त्यांनी ''कविता आणि मी'' या विषयावर आपले व्याख्यान दिले. ''कविता ही शब्दांची नाही, तर हृदयाची भाषा आहे. ती जेव्हा मनातून वाहते, तेव्हा ती केवळ रचना नसते ती एक अनुभूती असते !'' अशा शब्दांनी उद्घाटक सौ. सुचिता खाडे यांनी ''कविता आणि मी'' या विषयावर दिलेल्या व्याख्यानाची सुरुवात केली आणि सारा सभागृह क्षणभर स्तब्ध झाला. आपल्या सहजसुंदर आणि अनुभवसमृद्ध शैलीत बोलताना सौ. खाडे यांनी कवितेचा आत्मा, तिचा सामाजिक संदर्भ, आणि व्यक्तिगत जडणघडणीत कविता कशी संवाद साधते यावर अत्यंत मार्मिक भाष्य केले. ''कविता ही केवळ शब्दांची मांडणी नसून, ती मनाची भाषा, काळजाचा ठाव आणि आत्म्याचा स्पर्श असते,'' असे त्यांनी नमूद केले. त्यांच्या व्याख्यानात त्यांनी आपल्या कविता-प्रवासातील काही वैयक्तिक अनुभवही विद्यार्थ्यांसमोर उलगडले, जे ऐकताना उपस्थित साहित्यप्रेमी भावविवश झाले. कवितेतील सौंदर्य, सामाजिक जाणीव, जिव्हाळा, आणि जीवनप्रेम यांचं त्यांनी केलेलं चित्रण सर्वांना अंतर्मुख करणारं ठरलं. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संदीपान नवगिरे (प्रभारी प्राचार्य) होते. प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. दिलीप साठे (सहकार्यवाह) होते. मंडळाचे विभाग प्रमुख मा. श्री. संजय निचिते यांनी सौ. सुचिता खाडे यांचे स्वागत करताना त्यांच्या लेखणीचे मनःपूर्वक कौतुक केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच खाडे यांना मंडळातर्फे पुस्तक देऊन गौरविण्यात आले. हा संपूर्ण साहित्यिक कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या मनात दीर्घकाळ घर करून राहील, अशी प्रतिक्रिया प्राचार्य यानी दिली.




# ते ''पत्र''...


**ज्योतिर्मय साहित्य**

आज कपाटातून काही वस्तू काढत असताना ते पत्र अचानकपणे समोर दिसलं. अरे हो लक्षातच नाही आलं आजकालच्या पिढीला पत्र म्हणजे काय हे माहीत नसेल. तर पत्र म्हणजे काय हे आधी सांगायला लागेल. तुमच्या आजच्या सारखे मोबाईल, सोशल मीडिया, व्हॉट्सॲप वगैरे संपर्कासाठी इतर काही साधनं आमच्या वेळी नव्हती. आमच्या वेळेला म्हणजे साधारणपणे चाळीस पन्नास वर्षांपूर्वी होतं ते म्हणजे पत्र. तेव्हा दोन प्रकारची पत्र होती एक म्हणजे साधं पोस्टकार्ड व दुसरं अंतर्देशीय. नुसती ख्याली खुशाली कळवायची, विचारपूस करायची असेल तर पोस्टकार्ड. ते कोणाच्याही हातात पडलं व त्याने वाचलं तरी फरक पडणार नाही असा मजकूर असायचा तेव्हा पोस्टकार्ड. आणि जेव्हा थोडसं काही खाजगी किंवा उगाच इतर कोणी वाचू नये असा मजकूर असेल तर अंतर्देशीय पत्र पाठवली जात असत.

तर मी सांगत होतो त्या पत्राविषयी जे समोर दिसल्यामुळे एवढी प्रस्तावना लिहावी लागली. आता तुम्हाला वाटेल एव्हढं काय त्या पत्राचं असतात एवढी पत्र, काही लोकं ठेवतात किंवा ठेवायची मोजकी नीवडक पत्र जपून. तसचं मी ते आंतर्देशीय पत्र जपून ठेवलं आहे. खरं सांगू ते पत्र जेव्हा जेव्हा मी पाहतो ना त्या प्रत्येकवेळी मी अस्वस्थ होतो. आतापर्यंत मी भरपूर वेळा ते पत्र पाहिले आहे. हो हो पाहिले आहे, वाचले आहे असं मी म्हणतच नाही आहे. प्रश्न पडला असेल ना तुम्हाला मी असं का म्हणतो आहे, उत्सुकता लागली आहे ना जाणून घ्यायची. ठिक आहे तुमची उत्सुकता जास्त ताणत नाही, त्या पत्रात वाचण्यासारखे काहीच नाही आहे. कारण ते पत्र कोरे आहे.

बसला ना धक्का ? साहजिकच आहे कोणाचंही असचं होईल. विश्वास ठेवा माझ्यावर ते पत्र कोरं आहे, काहिही मजकूर त्याच्यात लिहिलेला नाही आहे. वर मध्यभागी त्यावेळच्या प्रथेप्रमाणे श्री लिहिलेले, उजव्या बाजूला तारीख. जिथून लिहिण्यास सुरुवात करायची, ज्याला मायना म्हणतात तिथे प्रिय लिहिलेले. बास बाकी काही नाही, पूर्ण पत्र कोरं करकरीत. पाठवणाऱ्याचे नाव नाही, पत्ता नाही. काय आणि कसं समजायचं? कोणी लिहिले असेल, ती असेल का तो, पुढे काय लिहायचे असेल, लिहिताना का थांबली असेल ती व्यक्ती, मला काही सांगायचे असेल, माझ्याबद्दल, काही महत्वाचं, काही व्यक्त करायचे असेल, हे आणि असेच काही इतर प्रश्न जे तुमच्या डोक्यात आले त्या प्रश्नांनी गेली कित्येक वर्षे माझ्या डोक्यात फेर धरला आहे. नुसते प्रश्न आणि प्रश्नच उत्तर काही सापडत नाही. बरं पत्रावर माझे नाव आणि पत्ता लिहिलेले असल्यामुळे दुसऱ्या कोणाचेतरी पत्र चुकून आले आहे ही पण शक्यता नाही.




शेखर देशपांडे
संपर्क : 98817 34580

सुरवातीला प्रिय लिहिले असल्यामुळे फार सुखावून गेलो होतो, आपण कोणाला तरी प्रिय आहोत हे म्हणजे खुपच भारी होतं माझ्यासाठी. कोणालातरी आपल्या विषयी काहीतरी वाटतं ही गोष्टच माणसाला खूप आनंद देणारी आहे. सुरवातीला खूप उत्सुकता होती जाणून घेण्याची, कोण असेल, कोणी लिहिले असेल. नाही म्हंटल तरी एक अनामिक हुरहुर होती, मनातल्या मनात कुठेतरी सुखावणारी भावना असायची. पूढे जसजशी वर्षे जायला लागली, तेव्हा ते सगळं कमी व्हायला लागलं. मधेमधे त्या पत्राचा विसर पडायचा, पण परत कधी ते समोर दिसलं की पुन्हा हे चक्र चालू रहायचं. बरं बायको पासून मी ते लपवून ठेवलं नव्हतं, तीला पण माझ ते पत्र दिसल्यावर हरवून जाणं वगैरे सगळं माहीत झालं होतं. कधीकधी ती माझी थट्टा पण करायची, गमतीने म्हणायची अजून किती वाट पाहणार आहात, खरंच ती येईल का? आणि आलीच तर तुमची काय प्रतिक्रिया असेल हे बघायला हवं. कधी म्हणायची जाऊद्या आता द्या सोडून, आता ह्या वयात ती भेटून तरी काय उपयोग. एकदा म्हणाली अहो आजकालची मुलं ते प्रॅंक करतात ना तसं तुमच्या बाबतीत कोणी केलं असेल.

ह्या गोष्टीत पूढे अचानक एक दिवस मोठा ट्विस्ट आला. नाही तुम्हाला वाटतय तसं कोणी भेटायला वगैरे आलं नाही. त्याच झालं असं, त्या दिवशी जेवण झाल्यावर आम्ही आईस्क्रीम खात गप्पा मारत बसलो होतो, मुलं पण होती. माझा फोन वाजला व तो दुसऱ्या रूममध्ये होता म्हणून मी तिकडे गेलो. दहा मिनिटांनी माझं बोलणं संपवून मी परत हॉलमध्ये येत असताना त्या तीघांचा मोठ्ठ्यांन हसण्याचा आवाज आला. मी विचारले अरे काय झालं एव्हढं, मलाही सांगा. तेव्हा मुलगा म्हणाला बाबा तुम्हाला ते पत्र कोणी पाठवलं होतं ते कळलं, असं म्हणून मूलं सौ. कडे पाहून हसायला लागली. मला काही कळेना, म्हंटलं जरा व्यवस्थितपणे सांगा, कोण आहे ती पत्र पाठवणारी व्यक्ती.

सौ. नी पूढे सांगायला सुरवात केली. अरे काय झालं पहिल्या बाळंतपणासाठी मी माहेरी गेले होते, तेव्हा तूझ्या बाबांना मी पत्र लिहायला घेतले होते. नुसती सुरवात केली पण पूढे लिहिणं झालंच नाही, आणि पत्र लिहिण्याअगोदर मी भावाला सांगितले होते की पत्र लिहिते तू बाहेर जाशील तेव्हा पेटीत टाक. आता त्या बिचाऱ्याची तरी काय चूक मीच सांगीतले होते, त्याने दिले ते पत्र पोस्ट करून. अरेच्चा, हे असं प्रकरण होतं तर. चला सुटलो बुवा म्हणून मोठ्ठा सुस्कारा सोडला मी. खरं सांगतो त्या रात्री मला खूप छान झोप लागली, कारण ज्या पत्राने इतकी वर्षे माझी झोप उडवली होती ते पत्र कोणी लिहिले होते ते आता कळले होते. बायकोला मी म्हणालो काय कमाल आहे गं तूझी इतकी वर्षे माझ्यापासून हे गुपित लपवून ठेवलेस.

पूढे काही दिवस गेले तरी कधीतरी त्या पत्राचा विचार यायचा मनात. वाटायचं आपल्याला कळायलाच नको होतं की ते पत्र कोणी लिहिले होते. एक प्रकारची मजा होती त्यावेळी जी उत्सुकता, हुरहुर वाटायची ती खरंच मजेशीर होती. आता परत तसं काही अनुभवता येणार नाही. असं असलं तरी पूर्वी नकळत समोर दिसणारं ते पत्र आता मी मुद्दाम काढतो कपाटातून व त्याच्यावरून अलगद हात देखील फिरवतो.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559